# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


सदरक्षणाय खलनिग्रहणाय

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

प्रेस नोट क्र-२०२ दिनांक -२८/०५/२०२४

## रात्रौ घरफोडी करुन चोरी करण्याऱ्या आरोपीत यास २४ तासाचे आत अटक

## माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक २१/०५/२०२४ रोजी २०.०० वा. ते दिनांक २२/०५/२०२४ रोजी ०७.०० वा. चे दरम्यान अकबर ट्रॅव्हल्स ऑफ इंडिया प्रा.लि., अंबाडी रोड, वेलनेस मेडिकलचे बाजुला, वसई पश्चिम, येथील बंद दुकानाचे लोखंडी शटर कोणीतरी अज्ञात चोरटयाने कशाचेतरी साहाय्याने तोडुन शटर उचकटुन त्यावाटे आतमध्ये प्रवेश करुन ऑफिसमधील रोख रक्कम व मोबाईल घरफोडी करुन चोरी झालेबाबत तक्रारदार नामे श्री विशाल विजय तावडे, वय ३८ वर्षे, यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. १७३/२०२४ कलम ४५४,४५७,३८० भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन गुन्हयाचे घटनास्थळावरील सी.सी.टी.व्ही फुटेज तपासुन त्याव्दारे आरोपीत याचा मागोवा घेवुन आरोपीत नामे राहुल राजु तायडे ऊर्फ पंखा फास्ट, वय २० वर्षे, धंदा डिलेव्हरी बॉय, रा. आय.टी.आय मराठा हॉटेलच्या बाजुला, ख्रिच्चनवाडी, अंधेरी पुर्व, मुंबई यास २४ तासाचे आत अंधेरी पुर्व परिरातुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे. आरोपीत याचेकडे कौशल्याने विचारपुस करता त्याने विधीसंघर्षग्रस्त बालकासह गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन रोख रक्कम, मोबाईल फोन व विदेशी चलन असा एकुण अं.किं.रु ९०,२८२/- चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्रीमती पौर्णिमा चौगुले/श्रिंगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई, श्री. राजु माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, व श्री. संतोष चौधरी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उ.नि. सनिल पाटील, पो.ह. शैलेश पाटील, पो.ह. शामेश चंदनशिवे, पो.ह. धनंजय चौधरी, पो.शि. गोविंद लबटे, पो.शि. आनंदा गडदे, पो.शि. प्रविण कांदे, म.पो.शि. शिंदे, म.पो.शि. पुजा कांबळे व पोलीस उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ ०२ चे पो.ह. भालचंद्र बागुल, पो.शि. अमोल बर्डे, यांनी यशस्विरीत्या पार पाडली आहे.